महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

रविवार ❖ २२ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक १७७ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024


# राज्य मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**
अखेर महायुती सरकारमध्ये महायुती सरकारमध्ये खातेवाटप झालं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याकडेच गृह खातं ठेवलं आहे. महसूल खात्याची जबाबदारी चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे देण्यात आली आहे.
मंत्रिमंडळाच्या शपथविधीच्या सहाव्या दिवशी महाराष्ट्रात मंत्रिमंडळामधील खातेवाटप अखेर झालं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वात महत्त्वाचे गृहखाते स्वतःकडे ठेवले आहे, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे वित्त आणि उत्पादन शुल्क खाते देण्यात आले आहे. देवेंद्र फडणवीस - गृह, ऊर्जा, लॉ अँड ज्युडीशिअरी एकनाथ शिंदे - नगरविकास, गृहनिर्माण अजित पवार - अर्थ, राज्य उत्पादन भाजपकडे असणारी खाती देवेंद्र फडणवीस - गृह, ऊर्जा, लॉ अँड ज्युडीशिअरी चंद्रशेखर बावनकुळे - महसूल राधाकृष्ण विखे- पाटील - जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे) चंद्रकांत पाटील - उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्यमंत्री गिरीश महाजन - जलसंपदा (विदर्भ, तापी आणि कोकण) गणेश नाईक - वनमंत्री मंगलप्रभात लोढा - कौशल्य विकास जयकुमार रावल - मार्केटिंग आणि प्रोटोकॉल पंकजा मुंडे - पर्यावरण आणि हवामान बदल, ॲनिमल हसबंडरी अतुल सावे - ओबीसी, डेअरी विकास आणि रिन्युएबल एनर्जी



मेघना बोर्डीकर - सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण माधुरी मिसाळ - शहरी विकास, वाहतूक, सामाजिक न्याय आकाश फुंडकर - कामगार जयकुमार गोरे - ग्रामविकास आणि पंचायती राज शिवेंद्रराजे भोसले - सार्वजनिक उपक्रम आशिष शेलार - माहिती तंत्रज्ञान नितेश राणे - नितेश राणे - मत्स्य आणि बंदरे अशोक उईके - आदिवासी विकास मंत्रालय
१५ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळाचा विस्तार महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर २३ व्या दिवशी १५ डिसेंबर रोजी नागपुरात मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. फडणवीस सरकारमध्ये ३३ कॅबिनेट आणि ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली. मुख्यमंत्री आणि २ उपमुख्यमंत्र्यांसह ही संख्या ४२ झाली आहे. मंत्रिमंडळात एकूण ४३ मंत्री शपथ घेऊ शकतात. एक जागा रिक्त ठेवण्यात आली आहे. फडणवीस सरकारमध्ये भाजपच्या १९, शिवसेनेच्या ११ आणि राष्ट्रवादीच्या कोट्यातील ९ मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. शिंदे सरकारमधील १२ मंत्र्यांना त्यात स्थान मिळाले नाही. यामध्ये भाजपचे ४, शिवसेनेचे ३, राष्ट्रवादीचे ५ आहेत. १९ नवीन मंत्री झाले.
यामध्ये भाजपचे ९, शिवसेनेचे ८ आणि राष्ट्रवादीचे ४ उमेदवार आहेत. याशिवाय ४ महिला (३ भाजप, १ राष्ट्रवादी) आणि १ मुस्लिम (राष्ट्रवादी) यांना सरकारमध्ये स्थान मिळाले आहे. सर्वात तरुण मंत्री राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे (३६) आहेत, तर सर्वात वयस्कर मंत्री भाजपचे गणेश नाईक (७४) आहेत.

### मुंबई/ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग मधील कॅबिनेट मंत्री

**’ एकनाथ शिंदे - उपमुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)**
**’ गणेश नाईक - वन**
**’ मंगलप्रभात लोढा - कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन**
**’ उदय सामंत - उद्योग व मराठी भाषा**
**’ आशिष शेलार - माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य**
**’ अदिती तटकरे - महिला व बालविकास**
**’ प्रताप सरनाईक - परिवहन**
**’ भरत गोगावले - रोजगार हमी,फलोत्पादन**
**’ नितेश राणे- मत्स्य आणि बंदरे**
**राज्यमंत्री - योगेश कदम - गृह (शहरी), महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन**


# बोटिंवरील सुरक्षा उपायांची तपासणी करा

## - रायगड जिल्हाधिकाऱ्यांचे सर्व तहसीलदारांना आदेश

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/उरण(प्रतिनिधी) :**
गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा जलप्रवासाच्या मार्गावर प्रवासी बोटीचा अपघात झाल्यानंतर प्रशासन जागे झाले आहे. रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने प्रवासी बोटींवरील सुरक्षेच्या उपाययोजनांची तपासणी करण्याचे आदेश जिल्ह्यातील तहसीलदारांना दिले आहेत.
अपघाताच्या पार्श्वभूमीवर आपल्या तालुक्यातील ज्या ज्या प्रवासी बोटींना प्रवासी वाहतूक परवाना देण्यात आला आहे, त्या बोटींची इनलॅण्ड व्हेसल कायदा १९१७ मधील व परवाना देतानाच्या नियमावलीमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत, याची तपासणी करावी. अनधिकृत व मंजूर प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करीत असलेल्या बोटींवर तातडीने कारवाई करावी. ऑनबोर्ड तिकीट देण्यास प्रतिबंध करावा, जेणेकरून बोटीच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रवासीसंख्येवर नियंत्रण करणे शक्य होईल. प्रत्येक जेटीवर बोटीमध्ये किती प्रवासी आहेत, याची नोंद संबंधितांनी ठेवण्याबाबत सूचना द्याव्यात, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

**तज्ज्ञांमार्फत तांत्रिण तपासणी करून घ्यावी**

प्रत्येक बोटीवर लाइफ जॅकेट, बोयाज रिंग बोयाज, टॉर्च, प्रथमोपचार पेटी, फ्लोटिंग रोप इत्यादी सुरक्षा साहित्य उपलब्ध आहे का, याची तपासणी करावी. बोटीवर प्रवेश करतानाच प्रत्येक प्रवाशाला लाइफ जॅकेट व सुरक्षेच्या सूचना संबंधित बोट/फेरीमालकांना देण्यात याव्यात. क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बोटीत चढणार नाहीत, याची आपल्या स्तरावरून नियमित तपासणी करण्यात यावी. सर्व प्रवासी बोटींची महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाच्या तज्ज्ञांमार्फत तांत्रिक तपासणी करून घेण्याच्या सूचना बोट-फेरीमालकाला द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांकडून संबंधित तहसीलदारांना दिल्या आहेत.



# महाराष्ट्रात मोठे प्रकल्प होणार

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**
येत्या काही वर्षात २ लाख १३०० हजार जणांना रोजगार मिळणार असल्याची मोठी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. १ जुलै २०२२ पासून महाराष्ट्रा २२१ विशाल आणि अतिविशाल प्रकल्प सुरु आहेत. यात ३ लाख ४८ हजार कोटी गुंतववणूक त्यात करण्यात आली आहे. यासह ३०३ प्रककल्पांचा विकास करण्यात येतोय. त्यापैकी ९५ प्रकल्प सुरु झालेत. विदर्भ तसेच मराठवाड्यात अनेक बडे उद्योजक गुंकवणूक करणार आहेत. २०२२ ते २०२४ या वर्षात महाराष्ट्रात २ लाख ४४ हजार कोटींची परकीय गुंतवणूक झालेली आहे. आपल्या राज्यातील उद्योग दुसऱ्या राज्यात गेल्याचा आरोप विरोधर करतात. त्यांनी ही आकडेवारी पहावी असा टोला एकनाथ शिंदे यांनी लगावला.

**महाविकासआघाडीला कायदा आणि सुव्यवस्थेबाबत बोलण्याचा नैतिक अधिकार नाही**

महाविकास आघाडीचे गृहमंत्री वलसुलीच्या आरोपाखाली जेलमध्ये गेले. पोलिस आणि उद्योगपतींच्या घराबाहेर बॉम्ब लावले. आता कादाय आणि सुववस्येखेच्या नावाने गळा काढताता. महाविकास आघाडीच्या सरकारच्या काळात पोलिस यंत्रणेचा गैरवापर केला गेला. मला आणि देवेंद्र फडणवीस यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी पोलिसांना हाताशी घेऊन कट रचले.
महाविकासआघाडीला कायदा आणि सुव्यवस्थेबाबत बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. पेनड्राईव्हमध्ये सर्व पुरावे आहेत. गुन्हेगारांना अभय दिला जाणार नाही. महाविकास आघाडी सरकारमध्ये मी मंत्री असताना मला जेल मध्ये टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. महाविकासआघाडी सरकारमध्ये कसे काम चालते हे मी जवळून पाहिले आहे.
सभागृहात बोलण्यापेक्षा अनेकांना मिडियाच्या कॅमेऱ्यावर बोलायला आवडते. सभागृह मनोरंजनाचा कट्टा नाही. जनतेले आपल्यायला निवडणून पाठवले आहे. यामुळे सभागृहाचे कामकाज गांभीर्याने घेतले पाहिजे.
नागपूरमध्ये लंडनसारखे वातावरण असते. अनेक जण पर्यटनासाठी येथे येतात. पर्यटन करतात आणि निघून जातात. लाडक्या बहिणींच्या सुरक्षेची जबाबादारी आमची आहे. लाडकी बहिण सुरक्षा योजना आम्ही आणली आहे. बदलापूरच्या आरोपीला अटक केल्यानंतर त्याने पोलिसांवर हल्ला केला. पोलिसांची बंदूक खेळणं वाटते का? बदलापूरची घटना घडल्यानंतर रेल्वे रोखून आंदोलन केले. जेव्हा त्याने पोलिसांवर गोळीबार केला आणि पोलिसांनी त्याला संपवलं यावेळी आरोपीच्या बाजूने उभे राहिले. पीडित मुलीच्या नावाने राजकारण केले. यानंतर आरोपीच्या नावाने गळा काढला. विरोधकांची दुटप्पी भूमिका चुकीची आहे. लहान मुलींवक लैंगिक अत्याचार उघडकीय येण्याचे प्रकार वाढले आहे. इतकचं नाही तर महाराष्ट्र गुन्हेगारीत आघाडीवर आहे. हे राज्यासाठी चांगले नाही. पण, चुकीला माफी नाही. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना सोडणार नाही. बीडच्या प्रकरणात कारावई झालेली आहे. स्वार्थी राजकाराणासाठी समाजात तेढ निर्माण केले जात आहे.

# कल्याण तालुक्यात टॉवरचे जाळे

## हजारो हेक्टर शेतजमीन होते निकामी

## शेतकरी उध्वस्त!



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण तालुक्यात विजेचे टॉवर उभारण्याची स्पर्धा सुरु झाली आहे. टाटा कपंनीने यापूर्वी चार विदयुत टॉवर लायन्या टाकून शेकडो हेक्टर जमीन फक्त कागदोपत्री शेतकऱ्यांची ठेवली आहे. या कपंनीने शेतकऱ्यांना मोबदला न देताच शेतकऱ्यांची हक्काची जागा टाटा कपंनी ने ही हडप केली आहे.
या पाठोपाठ स्टरलाईट मुबंई ऊर्जा कपंनीने कल्याण तालुक्यातील शेतकऱ्यांची फसवणूक करत आपली वीज टॉवर लाईन टाकली ही लाईन टाकताना शेतकऱ्यामध्ये आपापसात भांडणे लावून, दलालाना हाताशी याकपंनीने टॉवर लाईन सुरु करून आता शेतकऱ्यांना त्यांच्या कार्यालयात चकरा मारण्यास भाग पाडले आहे.स्टरलाईट मुंबई ऊर्जा कपंनीची एक टॉवर लाईन, तर वेहेळे पळसोली कडून ऊर्जा कपंनी ची दुसरी टॉवर लाईन गेली आहे. या टॉवर लाईनने तालुक्यातील दीड हजार हेक्टर जमीन बाधित केली आहे. बिचारा शेतकरी आज आपल्याच जमिनीची झालेली अवस्था बघूम आतल्या आत रडत आहे. शेतकऱ्यांचे पुढारी कम दलाल मात्र या टॉवर लाईन मध्ये ही विविध कामे घेऊन आपले उखळ पांढरे करून घेत आहेत.

> **माझ्या शेत जमिनीचे टॉवरमुळे उभे पीक नष्ट केले बांध तोडले, शेत जमीनीची वाताहत केली.नुकसान भरपाई देताना फक्त चकरा माराव्या लावल्या. ही टॉवर लाईन म्हणजे शेत जमिनी ची मोठी नासाडी आहे.**
> **- रघुनाथ चौधरी,शेतकरी दानबाव.**

# ‘सुशासन सप्ताह’ अंमलबजावणीचा आढावा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :**
१९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत ‘सुशासन सप्ताह’ साजरा करण्यात येत आहे.
यासंबंधी मा.डॉ. तुषाबा शिंदे, संचालक, भारत सरकार यांनी आज शनिवार, दि.२१ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील आयोजित बैठकीत ‘सुशासन सप्ताह’ अंमलबजावणीचा आढावा घेतला.
यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांनी ठाणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने पुष्पगुच्छ देवून श्री.शिंदे यांचे स्वागत केले. याप्रसंगी तहसिलदार किशोर मराठे, उमेश पाटील व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.
या अभियानांतर्गत विविध शासकीय विभाग/कार्यालयाकडून शिबिरे आयोजित करून, देण्यात येणाऱ्या विविध सेवा, प्राप्त/प्रलंबित तक्रारी अर्जावर कार्यवाही करून, जलदगतीने निपटारा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

# चारशे चार गावांत ‘पेसा दिन’ साजरा होणार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :**
केंद्र शासनाने दि. २४ डिसेंबर, १९९६ रोजी पंचायती संबंधीचे उपबंध(अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ अर्थात पेसा कायदा पारित केला आहे. पेसा कायद्याच्या निर्मितीला दि. २४ डिसेंबर, २०२४ रोजी २८ वर्षे पूर्ण होत आहे, त्यानिमित्ताने पंचायती राज मंत्रालयाच्या निर्देशाने हा दिवस ‘पेसा दिन’ म्हणून मुरबाड, भिवंडी, शहापूर तालुक्यातील महसूल गावांमध्ये साजरा करण्यात येणार आहे.
पंचायती राज मंत्रालयाचे अनुसूचित क्षेत्रांमध्ये पेसा कायद्याच्या अंमलबजावणीला बळकटी देण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहे. पेसा दिनाच्या निमित्ताने ग्रामसभा सदस्य, पंचायत सदस्य तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची क्षमताबांधणी व्हावी व त्यांच्यामध्ये जनजागृती वाढावी तसेच त्यांचा या कायद्याच्या अंमल बजावणीतील सहभाग वाढवून, ग्रामसभांचे सक्षमीकरण आणि अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या कामकाजात सुधारणा ही विशेष उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पेसा दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने गाव/ग्रामपंचायत पातळीवर मेळावा, प्रशिक्षण, कार्यशाळा आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत अंतर्गत सर्व पेसा गावातील संबंधीत घटकांनी सहभाग नोंदवावा तसेच ग्रामसभा सदस्यांनी जास्तीतजास्त उपस्थिती रहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.
ठाणे जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील, मुरबाड पंचायत समिती क्षेत्रातील ५५ ग्रामपंचायतींमधील १०१ महसूल गाव, भिवंडी पंचायत समिती क्षेत्रातील ४० ग्रामपंचायतींमधील ७३ महसूल गाव तर शहापूर पंचायत समिती क्षेत्रातील ११० ग्रामंपचायतींमधील २३० महसूल गाव असे एकूण ग्रामपंचायत २०५ तर महसूल गाव ४०४ येथे पेसा दिन प्रभावीपणे साजरा करण्यासाठी ग्रामपंचायत विभागाच्यावतीने नियोजन करण्यात येत आहे. पेसा कायद्याचे उत्तम ज्ञान असलेल्या व शक्यतो स्थानिक बोली भाषेचे जाणकार व्यक्ती, संस्था, अधिकारी यांनी उपस्थित सर्वांना पेसा कायद्याविषयी माहिती देणार आहेत, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) प्रमोद काळे यांनी दिली.
जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पंचायत समिती भिवंडी,शहापूर व मुरबाड येथील गट विकास अधिकारी, अधिनस्त विस्तार अधिकारी (पं), तालुका व्यवस्थापक(पेसा), तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा), ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामसभा मोबिलायझर व ग्रामस्तरीय कर्मचारी इ. सर्व यंत्रणेला पेसा दिन अंमलबजावणी उत्कृष्टपणे नियोजित करण्याबाबत निर्देशित केले आहे.
पेसा कायद्याशी संबधित घोष वाक्य व बॅनर यांचा वापर करून पेसा कायद्याची जनजागृती करण्यात येणार असून अनुसूचित क्षेत्रांतील ग्रामस्थांनी पेसा दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात येत आहे.

### सोमनाथ सूर्यवंशी याचा तुरुंगात झालेल्या मृत्यूबाबत

# पालघर येथे संविधानिक पद्धतीने धरणे आंदोलन



## पोलिसांनी अटक केलेल्या लॉ कॉलेजचा विद्यार्थी असलेला सोमनाथ सुर्यवंशी या बौद्ध तरुणाचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता पालघर(प्रतिनिधी) :**

परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालया जवळ असलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ भारतीय राज्यघटनेची प्रतिकृती बसवण्यात आली होती. मंगळवारी दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी एका समाजकंठकाने राज्यघटनेच्या प्रतिकृतीला सुरक्षित ठेवण्यासाठी लावण्यात आलेली काच फोडून विटंबना केल्याने शहरात संविधानप्रेमी नागरिकांमध्ये तणाव निर्माण झाला होता. आरोपींवर कठोर कारवाई करण्यासंदर्भामध्ये परभणीतील तरुण तसेच संविधान प्रेमी नागरिक रस्त्यावर उतरून कारवाईची मागणी करत असताना, पोलीस प्रशासनाने थेट बौद्ध वस्त्यांवर जाऊन कोंबिंग ऑपरेशन सुरू करून महिला व पुरुषांना तसेच युवकांना अमानुषपणे बेदम मारहाण केल्याने परभणी शहरात वातावरण चिघळले, पोलिसांनी अटक केलेल्या लॉ कॉलेजचा विद्यार्थी असलेला सोमनाथ सुर्यवंशी या बौद्ध तरुणाचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. राज्यात अनेक ठिकाणी विविध पक्ष, संघटनांनी आंदोलने करून या प्रकरणाचा निषेध नोंदवून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

तसेच पालघर मध्ये बहुजन समाज अन्याय अत्याचार विरोधी संघर्ष समिती पालघर जिल्ह्याच्या वतीने सर्व पक्ष संघटना,च्या वतीने निषेध करण्यात आल. व मानवतेला काळीमा फासणाऱ्या परभणी प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करण्यात यावी. असे निवेदन पालघर जिल्हाधिकारी यांना देण्यात आलं. या निवेदना मार्फत अशा मागण्या करण्यात आल्या की या प्रकरणांमध्ये पोलिसांच्या कोबिंग ऑपरेशनची आणि एकूण सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी.

कलम १७६ (1A) सीआरपीसी अन्वये या प्रकरणाची चौकशी करावी, न्यायालयीन चौकशी ही सेवानिवृत्त न्यायाधिशाकडून न करता सिटींग न्यायाधिशामार्फत करावी.पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड सह इतर पोलीस अधिकाऱ्यांवर कलम ३२ अन्वये, अॅट्रॉसिटी कायद्यान्वये कलम ३(१) आणि ३(२) प्रमाणे गुन्हे दाखल करावेत. सोबतच सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. परभणी शहरातील सर्व पोलीस स्टेशन मधील तातडीने सीसीटीव्ही जप्त करून ते सीसीटिव्ही तपासावे.सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना सरकारने तातडीने ५० लाखाची आर्थिक मदत जाहीर करावी. त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तिस तातडीने शासकीय नोकरी देवून त्यांचे पुनर्वसन करावे.न्यायालयीन कोठडीत असलेल्या आणि रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्वाचे पुन्हा एकदा न्यायाधिश यांच्या उपस्थितीत मेडीकल करावे.

पोलिसांनी केलेल्या कोबींग कारवाईत बौध्द वस्तीतील लोकांच्या झालेल्या घरांची नुकसान भरपाई द्यावी. जिल्हा प्रशासनाने त्या सर्व घरांचे तातडीने पंचनामे करून घ्यावे. पोलिसांच्या कोबिंग कारवाईत निर्दोष जखमी झालेल्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी. संविधान शिल्पाची विटंबना करणाऱ्या सोपान पवार याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा.१० डिसेंबर २०२४ रोजी पार पडलेला सकल हिंदू समाज मोर्चातील संयोजक यांची चौकशी करावी. यासोबत त्या मोर्चातील सर्वांची भाषणे तपासून त्यांच्यावर कारवाई करावी. अश्या प्रमुख मागण्या बहुजन समाज अन्याय अत्याचार विरोधी संघर्ष समिती पाल घर जिल्ह्याच्या वतीने व सर्व पक्ष संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी पालघर यांना निवेदन द्वारा देण्यात आले.

ह्या मागण्या महामहीम राष्ट्रपती, भारत सरकार, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री यांच्याकडे करण्यात आल्या . ह्या मागण्या तातडीने मान्य करून कारवाई करावी. व शांतता, कायदा सुव्यवस्था व लोकशाही अबाधित ठेवावी असे निवेदन देण्यात आले.

# वाहतूक पोलिसाच्या सतर्कतेमुळे वाचले २६ विद्यार्थ्यांचे प्राण

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

कुर्ला येथे मद्यधुंद चालकाने बस चालविल्याने झालेल्या अपघातात अनेकांना प्राण गमावावे लागले.

ही घटना ताजी असताना उल्हासनगरातून विरारला एक खाजगी बस विद्यार्थ्यांना घेऊन चालली होती. या खाजगी बसचा चालक बस वेडीवाकडी चालवित असल्याचे पोलिसाच्या लक्षात आल्याने पोलिसाने त्याला रोखले. बसचा चालक मद्यधुंद असल्याने त्यांच्या ताब्यातील बस पोलिसांनी जप्त केली. मद्यधुंद बस चालकाला

दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला. वाहतूक पोलिसाच्या सतर्कतेमुळे २६ विद्यार्थ्यांचे प्राण वाचले असून वाहतूक पोलिसांनी बजावलेल्या कर्तव्य दक्षतेचे शहरात कौतूक केले जात आहे.

शुक्रवारी सायंकाळी एक खाजगी बस उल्हासनगर येथील जग्गू फुटबॉल अकॅडमीतील २६ लहान मुलांना घेऊन विरारला जाण्यासाठी निघाली होती.



बसमधील लहान मुले विरारच्या ग्लोबल स्कूल येथे फुटबॉल खेळण्यासाठी जाणार होती.

उल्हासनगरातून निघालेली ही बस वालधूनी पूल उतरून कल्याणच्या सुभाष चौकात आली. बस चालक बस वेडीवाकडी चालवित होता. ही बाब सुभाष चौकात वाहतूक नियंत्रणाचे काम करणारे वाहतूक पोलिस सुरेश पाटील यांच्या निदर्शनास आली.

तात्काळ पोलिस पाटील यांनी बसच्या चालकाला हात दाखवून ती जागीच थांबविण्यास सांगितले. बस चालकाने बस थांबविली. तेव्हा पोलिस पाटील हे बस चालकाजवळ गेले.बस चालकाने मद्यसेवन केल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी बस चालक सुरेंद्र प्रसाद गौतम यांची ब्रेथ अ'नालायझर टेस्ट केली. त्यातही तो मद्य प्राशन केल्याचे उघड झाले. ही बाब अतिशय गंभीर असल्याने पोलिस पाटील यांनी बस चालकाच्या ताब्यातील बस जप्त केली.

बस चालकास दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला असल्याची माहिती वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक राजेश शीरसाट यांनी दिली आहे.

# सुधीर वायले यांच्या सामाजिक कार्याचा कॅलेंडरच्या माध्यमातून आढावा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

भाजपा कल्याण शहर उपाध्यक्ष सुधीर वायले यांच्या सामाजिक कार्याचा आढावा असलेले कॅलेंडर नागरिकांना मोफत मिळणार आहेत. नवीन वर्षाची चाहुल लागताच सर्वजण काहीतरी नवीन संकल्प नक्कीच करत असतात, असाच एक प्रयत्न भाजपा कल्याण शहर उपाध्यक्ष सुधीर वायले यांनी केला आहे. गेल्या काही वर्षात त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा देणारे नवीन वर्षाच्या कॅलेंडरचे यावेळी लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रेमनाथ म्हात्रे,



कल्याण शहर मंडळ अध्यक्ष वरूण पाटील, महिला शहराध्यक्ष वैशाली पाटील, हेमंत परांजपे, सुरेश ओसवाल, रितेश फडके, संदीप जाधव, विशाल शेलार, राजेंद्र चव्हाण, राजेश पैठणकर, प्रदीप उपाध्याय आणि टीम परिवर्तन संस्थेचे कार्यकर्ते अविनाश पाटील आणि भूषण राजेशिर्के उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यापुढेही सामाजिक कार्यात आपले शक्य ते योगदान देण्याचा संकल्प सुधीर वायले यांनी केला. त्याचबरोबर नागरिकांना हे कॅलेंडर मोफत दिले जाणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

# 'घर घर संविधान' पोहोचवण्याचा माणगाव तालुक्यातील सर्व शिक्षकांनी केला निर्धार

## शालेय दैनंपद्यार्थ्यांसमोर संतरंग उलगडणार





**दै.ठाणे जीवनदिप वार्ता बोरघर(विश्वास गायकवाड)**

'घर घर संविधान' ह्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करुन विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घर घर संविधान पोहोचवण्यासाठी माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमधील मुख्याध्यापकांची कार्यशाळा गोरेगाव व माणगाव येथे दोन टप्प्यात गटशिक्षणाधिकारी श्रीमती सुरेखा तांबट यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या दरम्यान श्रीमती सुरेखा तांबट गटशिक्षणाधिकारी, माणगाव यांच्या संकल्पनेतून 'घर घर संविधान' ह्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आखलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. या दरम्यान सुचवलेले सर्व उपक्रम स्वयंस्फूर्तीने प्रभावीपणे राबवून घर घर संविधान पोहोचवण्याचा निर्धार उपस्थित सर्व शिक्षकांनी आपला हात उंचावून केला.

सदर कार्यशाळेत मार्गदर्शन करताना संविधान अभ्यासक नुरखॉं पठाण यांनी संविधान म्हणजे नक्की काय आणि ते समजून घेण्याची आवश्यकता का आहे, याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. संविधानाच्या माध्यमातून आपण आपला देश कसा बनवणार आहोत आणि आपल्या देशातील सर्व नागरिकांना काय देणार आहोत, याविषयी सविस्तर मांडणी केली.

ठरलेल्या नियोजनानुसार आज कार्यशाळेत संविधानाविषयी मिळालेली माहिती उपस्थित शिक्षक आपल्या शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना देणार असून ऐकलेली माहीती विद्यार्थी आपल्या पालकांना सांगणार आहेत. उद्यापासून संविधानाविषयी रोज परीपाठादरम्यान संविधानाचे अंतरंग उलगडणारी माहीती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. ही माहिती संकलित करून तालुक्यातील सर्व शाळांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी संविधान अभ्यासक नुरखॉं पठाण यांना सोपविण्यात आली आहे.

'घर घर संविधान' ह्या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एक पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सुचवलेल्या सर्व उपक्रमांची अंमलबजावणी करून माणगाव तालुक्याचा एक आदर्श पॅटर्न बनवण्यासाठी सर्व शिक्षकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी श्रीमती सुरेखा तांबट गटशिक्षणाधिकारी माणगाव यांनी केले. या कार्यशाळेस विस्तार अधिकारी कुमार खामकर, धूळदेव कोळेकर, सर्व केंद्र प्रमुख, सर्व साधन व्यक्ती, व माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक व प्रसार माध्यम प्रमुख अनिल नाचपल्ले उपस्थित होते.

# कल्याण-डोंबिवलीतील ५०० चौरसफूट घरांवरील मालमत्ता कराला माफी मिळावी

## आ.सौ. सुलभाताई गणपत गायकवाड यांचे मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील गोरगरीब व मध्यमवर्गीय नागरिकांसाठी मालमत्ता कर मोठ्या आर्थिक अडचणींचे कारण ठरत आहे. या भागातील मोठ्या प्रमाणावर रहिवासी चाळींमध्ये राहत असून, या वर्गावर होणारा आर्थिक भार कमी करण्यासाठी ५०० चौरसफूटांपर्यंतच्या घरांवरील मालमत्ता कर माफ करण्याची मागणी माननीय आमदार सौ सुलभाताई गणपत गायकवाड यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे



आणि अजितदादा पवार यांना निवेदन देऊन करण्यात आली. नवी मुंबई महानगर पालिकेने नुकताच ५०० चौरसफूटांपर्यंतच्या घरांचा मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेने देखील असा निर्णय घेऊन लाखो नागरिकांना दिलासा दिला होता. या धर्तीवर कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेनेही हा निर्णय तातडीने घेण्याची मागणी होत आहे.

कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेचा मालमत्ता कर इतर महानगरपालिकांच्या तुलनेत अधिक असल्याने सामान्य नागरिकांना याचा आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. ५०० चौरसफूटांच्या घरांवरील कर माफ झाल्यास, गोरगरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना दिलासा मिळेल आणि त्यांच्या आर्थिक स्थैर्यात सुधारणा होईल.

तरी संबंधित प्रशासनाने या विषयाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी आणि सर्वसामान्य करदात्यांना या आर्थिक बोज्यातून लवकरात लवकर सूट मिळावी अशी मागणी माननीय आमदार सौ सुलभाताई गायकवाड यांनी केली आहे.

# पालघर जिल्ह्यात वीटभट्टीवर स्थलांतरित लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचा यशस्वी कार्यक्रम

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता पालघर(प्रतिनिधी) :**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या आदेशानुसार,दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी पालघर जिल्ह्यात वीटभट्टीवरील स्थलांतरित लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांमध्ये या तपासणीसाठी आरोग्य शिबीरे राबविण्यात आली. यासाठी प्रत्येक ठिकाणी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.





रवींद्र शिंदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी डहाणू तालुक्यातील जामशेत (कामडीपाडा) येथे भेट दिली. त्यांच्या सोबत प्रवीण भावसार (जिल्हा कार्यक्रम अधिकारी), श्री. अतुल पारस्कर कर (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, नरेगा), बाल विकास प्रकल्प अधिकारी, तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. या भेटीच्या वेळी वीटभट्टीवर स्थलांतरित लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.यावेळी आरोग्य विभागाच्या वतीने गरोदर महिला, स्तनदा माता, व ०-६ वयोगटातील बालकांची सविस्तर आरोग्य तपासणी करण्यात आली. लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांची समस्यांची माहिती घेण्यात आली. तपासणी व्यवस्थित व प्रभावी पद्धतीने पार पडल्याचे माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निरीक्षण केले.

यापुढे दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी आरोग्य विभाग व महिला व बाल विकास विभाग यांनी एकत्रितपणे आरोग्य तपासणी शिबीरे राबवावी, असे निर्देश देण्यात आले.

आरोग्य तपासणीसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समाधान व्यक्त केले व यासाठी आरोग्य व महिला बालविकास विभागाच्या कार्याचे कौतुक केले.

हा उपक्रम स्थलांतरित लाभार्थ्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी महत्त्वाचा ठरणार असून जिल्हा प्रशासनाने भविष्यातही अशीच सातत्यपूर्ण सेवा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## दैनिक राशिफल

२२ डिसेंबर २०२४
रविवार

**मेष**
कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस योग्य आहे. कोणतीही योजना राबवण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचा सल्ला अवश्य घ्या.

**वृषभ**
मानसिक बळ मिळेल. दिवस कुटुंबातील सदस्यांसोबत व्यतीत होईल. कोणतेही काम करण्यापूर्वी त्याच्याशी संबंधित माहिती घेतल्यास अधिक यश मिळेल.

**मिथुन**
राजकीय क्षेत्राशी संबंधित मित्राची ताकद तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल. त्याच्याशी फायदेशीर मुद्यांवरही चर्चा होणार आहे. तुमचे कौटुंबिक संबंध अधिक घट्ट होतील.

**कर्क**
तुमचे ध्येय निश्चित करण्यासाठी नवीन योजना कराल, ही योजना भविष्यात प्रभावी ठरेल. आरोग्याशी संबंधित किरकोळ समस्यांमुळे आळस वाढेल.

**सिंह**
तुमची प्रतिभा ओळखाल कामाचा क्रम पूर्ण उर्जेने सांभाळाल. काम करणाऱ्या लोकांना त्यांचा कोणताही प्रकल्प पूर्ण करण्यासाठी खूप मेहनत करावी लागेल.

**कन्या**
नवविवाहितांच्या जीवनात आनंद वाढेल. आज सकारात्मक दृष्टीकोनातून तुमचे जीवन समजून घेण्याचा प्रयत्न केला तर सध्या सुरू असलेले गैरसमज दूर होतील.

**तूळ**
ज्याचा तुमच्या कामकाजावर परिणाम होऊ शकतो. आज तुमचे लक्ष नवीन कामावर असेल. त्याचे सकारात्मक परिणाम देखील मिळतील.

**वृश्चिक**
तुमच्या जोडीदाराशी कडू आणि गोड वाद होतील. त्यामुळे नाती अधिक घट्ट होतील. चांगले परिणामही मिळतील. काही जुन्या मित्रांना भेटण्याची संधी मिळेल.

**धनु**
तुमची धर्म अध्यात्मावरील वाढती श्रद्धा तुम्हाला शांती आणि मानसिक आनंद देईल. जोडीदाराला समजून घ्याल. शैक्षणिक क्षेत्रात काळ अनुकूल असेल.

**मकर**
धार्मिक प्रवासाला जाण्याचा निर्णय घ्याल. राशीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांचे पूर्ण सहकार्य मिळेल. प्रतिभा ओळखून सर्जनशील कार्यात त्याचा वापर कराल.

**कुंभ**
कौटुंबिक वातावरण चांगले राहील. तुमच्या कामात तुमच्या कुटुंबातील सदस्य तुम्हाला साथ देत राहतील. व्यवसायात मेहनतीचा लाभ मिळेल.

**मीन**
कुटुंबातील सदस्य खुश असतील. तुमचे आरोग्य चांगले राहील. तुमच्या प्रियजनांसोबत चांगला वेळ घालवाल. घरगुती कामात रुची राहील.

दैनिक जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com




## मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्तांनी घेतला भाईंदर पश्चिम येथील बस डेपो जागा व बंदरवाडी स्मशानभूमी स्थळ पाहणी करून आढावा

आज दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी मिरा रोड स्टेशन पे अँड पार्क, मिरा रोड भाजी मार्केट, इंदिरा गांधी रुग्णालय, भाईंदर पश्चिम येथील बस डेपो जागा व बंदरवाडी स्मशान भूमी याठिकाणी स्थळ पाहणी करून आढावा घेतला. सदर पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता, स्वच्छता निरीक्षक व कनिष्ठ अभियंता उपस्थित होते.

तेथे कर माझे जुळती

# कनकलता बारुआ जयंती

(२२ डिसेंबर १९२९ - २० सप्टेंबर १९४२)



भारतातील सर्वांत तरूण स्वातंत्र्य सैनिक महिला / वीरबाला कनकलता बारुआ ह्या वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी 'भारत छोडो' ह्या आंदोलनात सामील झाल्या . नव्हे त्या शहीदच झाल्या . पाहू या कथा एका देशप्रेमाने भारलेल्या एका क्रांतिकारक कन्येची !कृष्णकांत व कर्णेश्वरी बरुआ या दांपत्याची निर्भिड कन्या कनकलता यांचा जन्म आसाम मध्ये दारंग जिल्ह्यातील बोरानगरी गावात दिनांक २२ डिसेंबर १९२९ रोजी झाला. त्यांचे आजोबा घानाकांता बरुआ हे सुप्रसिद्ध शिकारी होते. कनकलता ५ वर्षाच्या असतांना त्यांच्या आईचे निधन झाले. तर वडिलांचे निधन १३व्या वर्षी झाले. त्यामुळे लहान भावंडांची काळजी घेण्यासाठी कनकलता यांनी इयता तिसरीनंतर शाळा सोडली.

युद्धस्य कथा रम्या । अशी ही स्वातंत्र्य लढ्याची घडलेली गोष्ट आहे दारांग जिल्ह्यातील गोपूर गावची . २० सप्टेंबर १९४२ रोजी ग्वाल पाड्यातील पोलिस ठाण्यावर झेंडा लावायचे ठरवले तेथील गावकऱ्यांनी. देशभक्तीपर माहौल तयार झाला. ' भारत माता की जय ' व 'वन्दे मातरम ' घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला होता. ' विजयी विश्व तिरंगा प्यारा । झंडा उंचा रहे हमारा ' । यांसारखी स्वातंत्र्य गीते गायली जात होती . लहान थोरांच्या अंतःकरणात केवळ देशप्रेम उचंबळून आले होते. मिरवणूकीत मातृभूमिच्याच घोषणा दिल्या जात होत्या .

हे दृश्य पाहून ब्रिटिश अधिकारी चवताळले . त्यांनी निःशस्त्र मुलामुलींवर निर्घृण पणे हल्ला चढवला . सामान्य जनताही हे दृश्य पाहून संतापली .

आजूबाजूच्या खेड्यापाड्यातून घराघरातून लहान -थोर ,तरुण -वृद्ध बाहेर पडले . जनसागराच्या लाटा उसळल्या. ' करेंगे या मरेंगे ' या जिद्दीने कनकलता यांनी धैर्याने हातात तिरंगा घेऊन पोलीस चौकीच्या छपरावर झेंडा लावला . डौलाने चौकीवर झेंडा फडकत आहे , आणि कनकलते च्या मुखातून 'वंदे मातरम् ' गीत म्हटले जात आहे असे दृश्य दिसताक्षणी पोलीस चौकीवरून आलेल्या एका गोळीने कनकलता यांना टिपले . गोळी छातीवर लागली. त्यांचा मृत देह जमिनीवर पडण्यापूर्वी लोकांनी झेलला . लोकांचे हात रक्तबंबाळ झाले. कनकलता यांना वीरगती प्राप्त झाली . अविस्मरणीय योगदान! मातृभूमीच्या प्रेमासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या किशोर वयीन कनकलता बारुआ यांना ही आदरांजली! !



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

## मीरा भाईदर महानगरपालिका आयुक्तांच्या संकल्पनेतून उल्लेखनीय कामगारांचा सन्मान



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**भाईंदर(प्रतिनिधी) :**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या संकल्पनेतून'उल्लेखनीय कामगिरीचा सन्मान' ही नावीन्यपूर्ण संकल्पने अंतर्गत स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या संकल्पने अंतर्गत दिनांक ०९ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधीत १ लाखहून अधिक दंड वसुली करणाऱ्या प्रभाग समिती क्रमांक ०५ मधील स्वच्छता निरीक्षक अनिल राठोड व त्यांच्या टीमला मा. आयुक्त यांनी सन्मानित करून शुभेच्छा दिल्या. सदर प्रसंगी उपायुक्त (घ.क.व्य.) डॉ. सचिन बांगर व सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन उपस्थित होते.

स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी व नागरिकांना स्वच्छतेची शिस्त लागावी यासाठी महापालिका क्षेत्रात स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीम मार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. एकल वापर प्लास्टिक बंदी कारवाई, सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यांवर थुंकणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता पसरवणे इत्यादी प्रकारे महापालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे. प्रथम आठवड्यात उल्लेखनीय कामगिरी करून प्रभाग समिती क्रमांक ०५ मधील स्वच्छता निरीक्षक अनिल राठोड व त्यांच्या टीम मार्फत दिनांक ०९ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधीत रु. १,०५,७५०/- इतका दंड वसूल केल्या कारणाने दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी मा. आयुक्त यांच्या हस्ते स्वच्छता निरीक्षक व संपूर्ण टीमचा विशेष सत्कार करण्यात आला.

## उल्हासनगर महापालिकेचे विविध विकासकामांचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**उल्हासनगर(प्रतिनिधी) :**

उल्हासनगर शहरातील वाहतूक समस्येबाबत चर्चा करणेसाठी मा. महापालिका प्रशासक तथा आयुक्त श्री. विकास ढाकणे यांनी त्यांचे दालनात दिनांक २०/१२/२०२४ रोजी बैठक आयोजित केली.

सदर बैठकीत पुढील विषयांवर चर्चा करुन कार्यवाहांची दिशा ठरविण्यात आली. शहरातील मुख्य रस्ते व चौक येथील अनधिकृत रिक्षा धांब्यांवर कारवाई करणे, रिक्षा थांबे व रिक्षांची संख्या निश्चित करणे याकरिता वाहतूक पोलीस, पोलीस व महानगरपालिका अधिकारी यांची समिती गठीत करणेबाबत कार्यवाही करावी. सदर समितीची बैठक दर आठवड्यास घेवून पुढील कार्यवाहोचो दिशा ठरविण्यात येईल. सदर मोहिमेच्या जनजागृतीसाठी शहरात होडोंग्स, चित्रफिती प्रदर्शित करण्यात येणार आहे.

शहरातील मुख्य रस्त्यांवर पिवळे व पांढरे पट्टे मारणे, रस्त्यांवर नो पाकोंग, P1. P2 चे फलक लावणे, अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी वेळ निश्चित करणेकरिता गठीत केलेल्या समितीने पाहणी करण्यात



येवून यानंतर संयुक्त मोहिम दिनांक १ जानेवारी, २०२५ नंतर हाती घेवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. शहरात सुरु असणारी विकास कामे उदा. रस्त्यांची कामे, भुयारी गटार योजनेची कामे या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करणे. बॅरिकेटीग, सुरक्षा पट्टो लावणेबाबत कार्यवाही करावी. तशा सूचना संबंधित ठेकेदारांना देण्यात आल्या आहेत.

परिवहन सेवेच्या थांब्यांवर (BUS STOP) येथे रिक्षा उभ्या राहत असल्याने त्यांचेवर कारवाई करणेत येणार असून, मॅरेज हॉल, मोठे हॉटेल्स यांचे बाहेर होणा-या बेकायदा पार्कॉगवर कारवाई करण्यात येणार आहे. गदर्दीच्या वेळेस (PEAK HOURS) मुख्य रस्ते, चौक या ठिकाणी वाहतूक सुरळीत व्हावी यासाठो ट्राफिक वॉर्डन ठेवण्यात येणार आहेत.

शहरातील वाहतूक कोंडी होणारे रस्ते/चौक (BOTTLENECK POINTS) व शहरातील अपघातप्रवण क्षेत्र (BLACK SPOTS) ची महानगरपालिकेने यादी तयार केली असून तो वाहतूक शाखा यांच्या सल्याने त्या ठिकाणी आवश्यक कारवाई करणेत येणार आहे.

शहरातील ५ आदर्श रस्ते खालीलप्रमाणे करावयाची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे.

१. कल्याण अंबरनाथ रोड ३ कि.मी.
२. डॉल्फीन रोड :- १ कि.मी.
३. व्ही.टी.सी. रस्ता २ कि.मी.
४. मुरबाड रोड :- १.६८ कि.मी.
५. श्रीराम चौक ते १७ सेक्शन रस्ता ०.७८ कि.मी.

रस्त्यावरील अतिक्रमण हटविणे, दुभाजक बांधणे, लाइटिंग करणे, रोड लेन, झेब्रा क्रॉसिंग मार्किंग करणे, वाहतुकोशो निगडीत चिन्हे /माहिती फलक लावणे, रस्त्यांवरील खड्डे बुजवणे. वृक्षारोपण करणे,

वरील प्रमाणे कार्यवाही महानगर पालिकेकडून पुढील ३ महिन्यात करण्यात येणार आहे, असे सांगितले.

**सदर बैठकीस उल्हासनगर विधानसभा सदस्य श्री. मा. श्री. कुमार आयलानी, वाहतूक शाखा ठाणेचे पोलीस उप-आयुक्त श्री. पंकज शिरसाट, परिमंडळ ४ चे पोलीस उप-आयुक्त श्री. सचिन गोरे, महा पालिकेचे अतिरिक्त आयुक्त (२) श्री. किशोर गवस. वाहतूक शाखेचे सहायक पोलीस आयुक्त श्री.विजय पोवार, वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. अविनाश भामरे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुखदेव पाटील, कल्याणचे मोटार वाहन निरिक्षक-उप प्रादेशिक परिवहन अधिकारो श्री. बालाजी बोंदरवाड व महानगरपालिकेतील सर्व प्रभाग समितीचे सहायक आयुक्त उपस्थित होते.**
**-(छाया प्रकाश डांगळे)**
**जनसंपर्क अधिकारी**
**उल्हासनगर महानगरपालिका**

## डायघर गावात सर्प मित्रांनी अजगराला दिले जीवनदान



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण (प्रतिनिधी) :**

झपाट्याने वाढत असलेले शहरीकरण, डोंगर पोखरून गोडाऊन तयार करणे व अन्य कारणांमुळे हिंस्र प्राणी मानवी वस्तीजवळ येत आहेत. अशातच रात्री कल्याण शीळ फाटा रोडवरील डायघर गावाजवळ बंद असलेल्या कंपनीच्या जागेवर व भंगार वाल्याच्या दुकाना लगत लाकडाखाली बसलेला अंदाजे १४ ते १४.५० फूट आणि ३५ किलो वजनाचा इंडियन रॉक पायथन (अजगर) आढळून आला. स्थानिक गावकरी त्याला मारणार इतक्यात काही जागरूक नागरिकांनी सर्प रक्षकांना बोलविले.

पलावा सिटीमध्ये राहणारे विशाल कंथारिया, विजय राजभर, महेश मोरे, संतोष पंडागळे व अन्य सर्परक्षकांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने जागेवर उपस्थीत झाले. भारतीय अजगर सापाची सुखरूप सुटका करून स्थानिक वनविभाग अधिकारी दर्शन मिरकुटे यांच्या मार्गदर्शनाने शासकीय सोपस्कार पूर्ण करून जंगलात निसर्गमुक्त करण्यात आला.

तसेच बचाव कार्य करताना खूप गर्दी जमा झाली होती त्यामुळे अजगर सारखे मोठे जीव लुप्त होत आहेत. त्यामुळे प्रशासनाने भारतीय अजगर हा अनुसूची १ मध्ये समाविष्ट केला आहे. या जीवाची हत्या करणे, तस्करी करणे गुन्हा आहे. परंतू अंधश्रध्देमुळे सापाची मोठ्या प्रमाणावर हत्या करण्यात येते अशी माहिती देण्यात आली. यापुढे कुठेही वन्यजीव आढळल्यास हॅलो फॉरेस्ट १९२६ या टोल फ्री हेल्पलाइन वर संपर्क करा तसेच सर्परक्षकांची मदत घ्या अशी माहिती जेष्ठ सर्परक्षक विशाल कंथारिया यांनी उपस्थीत जनसमुदायाला जनजागृती करत दिली.

## सार्वजनिक वाचनालयात अल्पसंख्याक हक्क दिन साजरा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**

अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची जाणीव व माहिती होण्याकरिता प्रबोधन व लोकशिक्षण आवश्यक आहे. आपल्या देशात एकात्मता आहे यासाठी अल्पसंख्याक हक्क दिनाची चळवळ अशीच पुढे चालू राहील याविषयी शंका नाही असे प्रतिपादन न्यू हायस्कूल कल्याणचे माजी प्राचार्य सुधाकर खैरे यांनी सार्वजनिक वाचनालय कल्याण, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पु.भा.भावे व्याख्यानमालेअंतर्गत अल्पसंख्याक हक्क दिनी केले.

अल्पसंख्याक हक्क दिनाच्या औचित्याने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यात कवी अन्वर मिर्झा, रंगकर्मी सुधीर चित्ते व सुधाकर वसईकर यांनी सहभाग नोंदविला त्यात अल्पसंख्याक कोणास म्हणावे ? जागतिक स्तरावर असलेले अल्पसंख्याक, केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे अल्पसंख्यांक गटांबाबत कार्य, उदिष्ट आणि उपाययोजना इ. विषयांवर चर्चा करण्यात आली. अल्पसंख्याकांना त्यांची संस्कृती, भाषा,धर्म परंपरा इ. संवर्धन करता यावे याविषयी अभिव्यक्त होण्याकरिता वाचनालयाच्या ग्रंथसेविकांसाठी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वर्षा माने, पूजा चिराटे, वैष्णवी कल्याणकर, साक्षी मेळावार, शुभांगी श्रीगंधेवार यांनी पारितोषिके पटकावली.

वाचनालयाचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी, सरचिटणीस भिकू बारस्कर यांच्या मार्गदर्शना खाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी कार्यकारिणी सदस्य विजयसिंह परदेशी, ज्येष्ठ कवी प्रशांत मोरे, सिद्धार्थ मोरे- माजी प्रादेशिक निर्देशक (कामगार शिक्षण मंडळ, श्रम मंत्रालय, नाशिक), वाचकवर्ग, तसेच ग्रंथसेविका उपस्थित होते.



## अनधिकृत नळ जोडण्यांवर उल्हासनगर महापालिकेची टाच

### पाणी चोरी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल होणार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**उल्हासनगर(प्रतिनिधी) :**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील पाणी समस्येवर मा. आयुक्त श्री विकास ढाकणे मा. अति. आयुक्त श्री जमिर लेंगरेकर, मा अति आयुक्त श्री किशोर गवस यांनी पाणी पुरवठा विभागातील अधिका-यांसोबत दिनांक २७/११/२०२४ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये शहरामध्ये होणा-या पाणी समस्ये बाबत चर्चा करण्यात आली त्यामध्ये सर्व प्रथम उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुख्य जलवाहिनीवर असलेले अनधिकृत नळ कनेक्शन काढुण टाकणे बाबतची कार्यवाही त्वरीत सुरु करावी असे निर्देश मा. आयुक्त सो यांनी दिले. त्याअनुषंगाने दिनांक २९/११/२०२४ रोजी पाले टॅपींग पॉईट गायकवाड पाडा



येथुन उल्हासनगर ०५ येथे येणा-या मुख्य जलवाहिनीवर असलेले १ इंचाचे एकुण २२ अनधिकृत नळ जोडणी खंडीत करण्यात आल्या होत्या त्यानंतर आज दि. २०/१२/२०२४ रोजी उर्वरीत कार्यवाही मध्ये एकुण २४ अनधिकृत नळ जोडण्या खंडीत करुन कार्यवाही पुर्ण करण्यात आली.

तसेच यापुढे कोणत्याही व्यक्तीने मुख्य जलवाहिनी वर अनधिकृत पणे नळ जोडणी केल्यास / आढळल्यास त्या व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल.

सदर कारवाई मध्ये कार्यकारी अभियंता श्री परमेश्वर बुडगे, उपअभियंता श्री दिपक ढोले, उपअभियंता श्री अशोक घुले, कनिष्ठ अभियता श्री अश्विन राठोड, श्री हरेश मिरकुटे, तसेच विशेष अधिकारी श्री विजय मंगलानी व दक्षिण क्षेत्र उपविभागातील कर्मचारी उपस्थित होते.

सदरची कारवाई मा. आयुक्त श्री विकास ढाकणे मा अति. आयुक्त श्री जमिर लेंगरेकर, मा. अति आयुक्त श्री किशोर गवस यांचे मार्गदर्शना खाली करण्यात आली.

**नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

## ठाण्यात ३ जानेवारीला अग्निदूतांचे अग्निशमन 'मॉक ड्रील'

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांना अभिप्रेत असणारे तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'ठाणे बदल तंय' संकल्पनेतून शिवसेना गटनेते व मा. नगरसेवक दिलीप बारटक्के यांनी ठाणे शहराच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सवात 'ठाणे बदलतंय' देखावा साकारत 'ठाणे बदल तंय' या उपक्रमाचा प्रचार, प्रसार शुभारंभ स्वा सावरकर नगर येथे करण्यात आला. तर गणेश-विसर्जन मिरवणुकीत सळसळती तरुणाईचा 'ब्रो ठाणे बदलतंय! हा विषय घेण्यात आला तसेच लोकसहभागातून 'डीप क्लीन ड्राईव्ह' स्वच्छता देवीचा सत्कार..आदि उपक्रम राबविण्यात आले.

येणाऱ्या नवीन वर्षात अग्निदूत अग्निशमन कसे करतात या 'ठाणे बदलतंय' या उपक्रमात ठाणेकरांमध्ये अग्निसुरक्षेच्या



दृष्टिकोनातून जागरूकता निर्माण होण्यासाठी लोकमान्य नगर शिक्षण मंडळ व बारटक्के फाऊंडेशन संयुक्त विद्यमाने आयोजित शनिवार ३ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत भारतरत्न श्रीमती इंदिरा गांधी विद्यामंदिर व रा .ज. ठाकूर ज्युनियर कॉलेज स्वा. सावरकर नगर ठाणे या शैक्षणिक,आस्थापनां मध्ये शहरात आगीच्या घटना कुठेही घडल्यास तर त्याला तोंड देण्यासाठी ठाणे महानगर पालिका अग्निशमन यंत्रणा कशी सज्ज होते, याची माहिती, नागरिकांची कर्तव्ये, आग प्रतिबंधक उपाययोजना, आपत्कालीन उपाययोजना, आणि 'कारवाई प्रात्यक्षिके' 'मॉक ड्रील' ठाणे महानगर पालिका व पोलीस दलाची मदत घेऊन विद्यार्थ्यांना दाखवणार आहेत.

समस्त ठाणेकरांनी कोपरी-पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघात लोकमान्य नगर शिक्षण मंडळ व बारटक्के फाऊंडेशन आयोजित या अग्निदूतांचे अग्निशमन 'मॉक ड्रील' उपक्रमास भेट द्यावी. सहकार्य करावे असे आवाहन शिवसेना गटनेते व मा. नगरसेवक दिलीप चंद्रकांत बारटक्के यांनी केले आहे.

# कला ही माणसाला जीवनात आनंद देते – प्रताप पाटील

## जिल्हा परिषद राहनाळ शाळेत केंद्रस्तरीय गुणदर्शन स्पर्धा संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

माणसाने जीवनात कोणती तरी एक कला आत्मसात केली पाहिजे. तीच कला माणसाला जीवनात आनंद देते. शालेय विद्यार्थी आपल्या विविध कला या ठिकाणी सादर करतात. निश्चितच ही मुलं जेव्हा मोठी होतील तेव्हा कोणत्यातरी कलेच्या माध्यमातून पुढे जातील. अशा स्पर्धा सातत्याने व्हायला हव्यात असा आशावाद राहनाळ ग्रामपंचायतीचे प्रभारी सरपंच प्रताप पाटील यांनी व्यक्त केला.




केंद्रस्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ या ठिकाणी संपन्न झाल्या. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायतचे प्रभारी सरपंच प्रताप पाटील, भिवंडी पं.स. च्या माजी सभापती ललिता पाटील, ग्रामविकास अधिकारी गणेश पडवळ, ग्रामपंचायतचे सदस्य उमेश पाटील, मनीषा भोईर, परीक्षक पंकज पाडाले, स्वाती सोनगावकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रमिला कडू, उपाध्यक्ष मनाली जाधव, रजनी नाईक, केंद्रप्रमुख शरद जाधव, गटशिक्षण अधिकारी संजय अस्वले, विषय तज्ञ विष्णू पाटील, उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी समुहगायन, नृत्य, नाट्य, वकृत्व स्पर्धा अशा विविध कलाचे सादरीकरण केले. स्पर्धेत समूह गायन लहान, गट मोठा गट प्रथम क्रमांक शाळा कालवार, वकृत्व स्पर्धा शाळा कालवार, शाळा डुंगे, नाट्य स्पर्धा जिल्हा परिषद शाळा राहनाळ नृत्य स्पर्धा प्रथम क्रमांक राहनाळ, उत्कृष्ट अभिनयाची ट्रॉफी पूर्वी घारगे हिला दिली.सर्व विद्यार्थ्यांना उमेश पाटील आणि पंकज पाटील यांनी आपल्या आई बाबांच्या स्मरणार्थ बक्षिसे दिली. तसेच प्रताप पाटील यांनी सर्व सहभागी शाळांना रोख ५०० रुपये बक्षिस दिले. अत्यंत उत्साह अशा वातावरणामध्ये स्पर्धा संपन्न झाल्या. गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले यांनी सांगितले.की, मुलांनी प्रत्येक कलेमध्ये सहभाग घेतला पाहिजे. आपल्या जीवनामध्ये कलेचा आनंद घेतला पाहिजे. लहानपणापासून जर विद्यार्थ्यांनी कला आत्मसात केली तर मोठेपणी निश्चितच मुले आपली कला अजून प्रगल्भ पद्धतीने सादर करू शकतील. असा आशावादी व्यक्त केला. तानाजी पाडाले, स्वाती सोनगावकर यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांमध्ये टॅलेंट ठासून भरलेले आहे या विद्यार्थ्यांना मोठे व्यासपीठ मिळायला पाहिजे. असा आशावादी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन अजय पाटील तर आभार प्रदर्शन अंकुश ठाकरे यांनी केलं.

# मिरा भाईदर पालिका आयुक्तांचे बनावट व्हॉटसअप अधिकाऱ्यांकडेच पैशांची मागणी

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता भाईंदर(प्रतिनिधी)**

मिरा भाईंदर महापालिकेचे आयुक्त संजय काटकर यांच्या नावाचे बनावट व्हाट्सअप्प क्रमांकावरून पैसे मागितल्याचा प्रकार समोर आला आहे.



पालिकेने प्रसिद्धी पत्रक काढून अशा कोणत्याही संदेशाला बळी न पडण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

देशभरात सायबर गुन्हाच्या प्रकरणात मोठी वाढ झाली आहे.यात एखाद्या व्यक्तीच्या नावे बनावट मोबाईल क्रमांक तयार करून पैसे उकळण्याचे काम हे सायबर भामटे करत असतात. आता या भामट्यानी चक्क मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर यांच्या नावे बनावट व्हाट्सअप क्रमांक (+९१-७०६९४५८२०६)तयार केला आहे.आणि पालिकेच्याच अधिकाऱ्यांना व शहराती प्रतिष्ठित नागरिकांकडे पैश्याची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे अशा संदेशाला बळी न पडता थेट पोलिस ठाण्यात तक्रार करावी असे आवाहन पालिकेच्या जनसंपर्क विभागाकडून करण्यात आले आहे.

# कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे बोधचिन्हाचा गैरवापर करणा-यावर कारवाई कधी होणार ?

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेच्या बोध चिन्हाचा गैर वापर करणा-या प्रतीक पेणकर नावाच्या भामट्या समाजसेवकाला स्वतः महानगरपालिकेचे अधिकारी पाठीशी घालण्याचा कार्य करीत असल्याची बातमी समोर आली आहे.




ह्या बाबत तक्रारदार करनजीव शर्मा यांनी महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना १२/०९/२०२४ रोजी पत्र लिहून बोध चिन्हाचा गैर वापर करणा-या प्रतीक पेणकर वर कार्रवाई करण्याची मागणी केली होती. परंतु पोलीसांनी ह्या गुन्ह्यात सरळ गुन्हा दाखल ना करता महानगर पालिका आयुक्त/ प्रशासक यांना पत्र क्र .गोपनीय जावक क्र./११७०/२०२४ दिनांक २०/०९/२०२४ लिहून योग्य ती कार्रवाई करण्याची विनंती केली आहे. पोलीसांकडून पत्र पाठवून सुद्धा महानगरपालिका आयुक्त यांनी काही कार्यवाही केली नाही. ह्या संदर्भात तक्रारदार करनजीव शर्मा यांनी सांगितले की गणेशोत्सव दरम्यान बैल बाजार मोक्षभूमि जवळ महानगरपालिके तर्फे मूर्ति विसर्जन साठी कृत्रिम तलाव बांधला गेला होता. त्या तलावाच्या बाजूला प्रतीक प्रकाश पेणकर यांनी अनधिकृत रीत्या होर्डिंग्स लावून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने आणि प्रतीक प्रकाश पेणकर ह्यांच्या प्रयत्नांने गणपति विसर्जना साठी कृत्रिम विसर्जन तलावाचे आयोजन केलं आहे. ह्या शीर्षकाखाली कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे बोधचिन्हाचा गैर रीत्या वापर केले . ह्या बाबती मी त्या वेळी क प्रभाग क्षेत्र अधिकारी तुषार सोनावणे यांना तक्रार देऊन होर्डिंग्स जब्त करून प्रतीक प्रकाश पेणकर ह्यांच्या विरोधात कार्यवाही करण्याची मागणी केली. पण प्रभाग अधिकारी तुषार सोनावणे यांनी सदर होर्डिंग्स लावणा-या प्रतीक पेणकर वर कारवाई ना करता , होर्डिंग्स वर लावलेला बोधचिन्ह कापून होर्डिंग्स परत त्याच ठिकाणी परत लावलं. ह्या बाबती मी महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन ला लेखी तक्रार दिली असता . पोलीसांनी महानगरपालिका आयुक्त यांना माझी तक्रार पुढील कार्रवाई करण्यासाठी पाठविली आहे. पण तीन महीने उलटून ही महानगरपालिका आयुक्तांनी काही कार्रवाई केली नाही. तक्रारदार करनजीव शर्मा यांनी प्रतीक पेणकर आणि तत्कालीन प्रभाग अधिकारी तुषार सोनावणे वर योग्य ती कार्रवाई करण्याची मागणी केली आहे.

# आवक घटल्याने डाळींबाची चढया दराने विक्री

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

हिवाळा ऋतू म्हणजे विविध देशी फळांचा सुगीचा हंगाम. याच सुगीच्या हंगामात आता पश्चिम महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून येणाऱ्या डाळिंबांना चढे दर मिळू लागल्याने व्यापाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. तर डाळिंबाच्या खरेदीसाठी अधिकचे पैसे मोजावे लागत आहे. मागील एक दीड आठवड्याच्या कालावधीत नवी मुंबई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये डाळिंबाची आवक काही प्रमाणात घटली असल्याने किरकोळ बाजारात डाळिंबांची तब्बल २०० ते ३०० रुपये किलोच्या दराने विक्री केली जात आहे. यामुळे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य असलेला ' भगवा ' जातीच्या डाळिंबाची सध्या फळबाजारात चलती दिसून येत आहे.

हिवाळ्यात मोठ्या प्रमाणात सफरचंद, सीताफळ तसेच डाळिंब यांची नागरिकांकडून चांगली मागणी असते. थंडी मध्ये आहारात विविध फळांचा नागरिक आवर्जून समावेश करत असतात. शरीरातील ऊर्जा वाढविण्यासाठी, रक्त प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी थंडीच्या कालावधीत नागरिक प्रामुख्याने डाळिंबाचे सेवन अधिक करतात. यामुळे सफरचंदासह डाळिंबाला देखील याकालावधीत अधिक मागणी असते. याच पद्धतीने मागील काही दिवसांपासून नवी मुंबई, ठाणे आणि आसपासच्या उपनगरातुन डाळिंबाला मोठी मागणी आहे. त्यातही सध्या व्रत - वैकल्यांचा मास असलेल्या मार्गशीष महिना सुरु असल्याने देखील फळांची बाजारात मोठी मागणी आहे.

### नितेश डोंगरे लिखित दिग्दर्शित व गर्जा प्रतिष्ठान निर्मित

# व्हू किल्ड मी ? नाटकाचा प्रयोग

## अत्रे रंगमंदिर कल्याण येथे सादर

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(बाळासाहेब भालेराव):**

_सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या माध्यमातून ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा जोरदारपणे सुरु असून या स्पर्धेत हौशी कलावंत आणि संस्था सहभागी होऊन आपल्यातील कलागुणांचे सादरीकरण करतात. यंदाही दरवर्षीप्रमाणे मुरबाड सारख्या ग्रामीण भागातील लोककलावंत सिद्धहस्त लेखक, दिग्दर्शक नितेश डोंगरे यांनी आपल्या गर्जा प्रतिष्ठानच्या माध्यमातून व्हू किल्ड मी ? या नाटकाचा प्रयोग सादर केला.



आज देशाला आई मानणाऱ्या देशातच अत्याचाराच्या घटनांनी अक्षरश धुमाकूळ घातला आहे. दर पंधरा मिनिटाला या देशात अत्याचाराची एक घटना घडत आहे. या घटना संपूर्णतः मिटविण्यासाठी, या साऱ्यांचे मूळ असलेली पाशवीवृत्ती प्रथमतः ठेचून काढणे गरजेचे आहे. त्याच साठी प्रत्येक भारतीयाच्या हृदयात जागृततेची मशाल पेटवत, वास्तविकतेला भेदणारी काल्पनिकतेची गुंफण म्हणजेच 'व्हू किल्ड मी ? ' हे नाटक गर्जा प्रतिष्ठान मुरबाड यांच्या माध्यमातून नुकतेच आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण येथे पहिला प्रयोग म्हणून सादर करण्यात आले.

या प्रयोगाला नाट्यप्रेमी रसिक प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देवून कलाकारांचे मनोबल वाढवले.व्हू किल्ड मी ? सारख्या अनेक नाटकांचे लेखन करुन लेखक नितेश डोंगरे हे दरवर्षी होणाऱ्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत आपल्या स्वतःच्या लेखणीतून आणि दिग्दर्शनातून आपल्या प्रत्येक कला कृतीतून समाजाला काहीतरी नवीन देण्याचा प्रयत्न करून सामाजिक संदेश देणाऱ्या नाटकांची निर्मिती करत असतात. या आधी त्यांनी 'शांतिकुंज', 'सिम्पल गोष्ट', 'सूर्यास्त', 'युद्ध अटळ आहे' ' देव दगड ' या सारख्या सामाजिक संदेश देणाऱ्या नाटकांची निर्मिती करून आपले वेगळेपण जपले होते. रसिकांनीही या नाटकांना भरभरुन प्रतिसाद दिला होता. यावर्षी सुद्धा नितेश डोंगरे यांनी आपल्या नाटकाचे वेगळेपण जपले असून पाशवी वृत्तीच्या समूळ उच्चाटनासाठी जागरूकतेची मशाल पेटविणे गरजेचे आहे. हा संदेश दिला आहे.

या नाटकामध्ये प्रमुख भूमिकेत असणाऱ्या सानिका कांबळे, स्नेहा शेलार, सानिका भोईर, हर्षला शेलार, मायरा रोठे, राजनंदिनी लांजेवार, दीपाली तरे, दिव्या विशे, अजिंक्य डोंगरे, संतोष भांडे, गणेश शिंगोळे, भूषण मोरे, रोशन देसले, प्रथमेश रोठे, प्रदीप देसले, विनय गायकर, निशांत कडू, भूषण मिरकुटे, योग पाटील, हनुमंत चौधरी,आणि स्वतः नितेश डोंगरे यांनी आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ पाडली आहे.या नाटकाच्या यशस्वी प्रयोगास प्रकाश योजना जयेश माळी, तर नाटकाच्या प्रत्येक कलाकारास हुबेहूब वेशभूषा रंगभूषा देण्याचे काम वैजयंता भांडे यांनी केले. नेपथ्य प्रथमेश रोठे आणि या नाटकासाठी उत्तम संगीत सचिन कालेकर - महेश वाळकोळी यांनी केले होते. निर्मिती प्रमुख म्हणून कुणाल घोलप ,वैभव खाटेघरे, विकास गोंधळी यांनी जबाबदारी पार पाडली. तर रंगमंच व्यवस्थापन हरेश दळवी, रुपेश खाटेघरे, संदीप खरे यांनी केले.

संदीप कापडी, समीर खुटारे, हनुमान डोंगरे, संदीप देशमुख, जय मनोरे, विवेक शेळके, किरण डोंगरे, चंदू राणे या संपूर्ण गर्जा टीम आणि अत्रे रंगमंदिराच्या सर्व कर्मचारी वगनि या नाटकासाठी विशेष सहकार्य करुन नाटक रंगविण्यासाठी मेहनत घेतली.

# सुनिल इंगळे यांना पितृशोक



कल्याण पश्चिम येथील सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार सुनिल इंगळे यांचे पिताश्री कै. मुरलीधर इंगळे यांचे अल्पशा वार्धक्यामुळे अकस्मात काल शुक्रवारी पहाटे २०/१२/२४ला डोंबिवली येथील रहाते घरी निधन झाले.ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.भावपुर्ण श्रद्धांजली.

# मुंबई ठाणे रायगड व पालघरमधील शाळांना मिळणार लिपिक

शिक्षकेतरांच्या संच मान्यतेत लिपिक पदे मंजूर झाल्यावर सुद्धा अनेक शाळांना अजूनही लिपिक मिळत नसल्याच्या मुंबई विभागातील अनेक शाळांच्या तक्रारीनुसार मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक श्री संदीप संगवे साहेब व सहाय्यक शिक्षण उपसंचालक श्री सुनिल सावंत यांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

याबाबत शिक्षण उपसंचालकांनी तातडीने मुंबईतील तीनही शिक्षण निरीक्षक तसेच ठाणे पालघर व रायगड शिक्षणाधिकारी यांना आदेश देऊन कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. सोबत आदेशाची प्रत आहे अवलोकन व्हावे. ज्या शाळांनी लिपिक पदाचे प्रस्ताव शिक्षण विभागाकडे पाठविले असतील त्यांनी संघटनेशी संपर्क साधावा

# राज्यस्तरीय शिक्षक निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

यशवंतराव चव्हाण सेंटर, शिक्षण विकास मंच यांच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. ही निबंध स्पर्धा प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी घेण्यात आली होती. या निबंध स्पर्धेसाठी दोन विषय देण्यात आले होते.

(१)अशैक्षणिक कामे नसतील तर शिक्षक म्हणून आत्तापेक्षा अधिक मी काय-काय करू शकेन?(२) शिक्षकांना कोणत्या गोष्टीचे स्वातंत्र्य हवे आणि का?

या निबंधस्पर्धेस राज्यभरातून खूप मोठा प्रतिसाद मिळाला. इंग्रजी आणि मराठी या दोन माध्यमातून घेण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्यातील विविध भागांतून एकूण ८८० निबंध प्राप्त झाले. गोपनीयता राहावी यासाठी आलेल्या सर्व निबंधांना क्रमांक देण्यात आले. ज्या स्पर्धकांनी आपले नाव किंवा त्यांची ओळख पटेल असा मजकूर निबंधात लिहिला होता त्यांना बाद करण्यात आले.

त्यानंतर उर्वरित निबंधांची विषयानुसार विभागणी करण्यात आली. विषयनिहाय प्रत्येकी दहा परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. एकूण पाच फेऱ्यांमध्ये निबंधांची तपासणी करण्यात आली. ज्या निबंधाला परीक्षकांनी ए श्रेणी दिली आहे अशाच निबंधांची निवड अंतिम फेरीत संयुक्त क्रमांक पद्धती (Composite Rank Method) वापरून चार निबंधांची निवड करण्यात आली. इंग्रजी माध्यमाचा लक्षणीय प्रतिसाद लाभल्यामुळे त्यांचे दोन स्वतंत्र परिक्षकांमार्फत परीक्षण करून तिसऱ्या फेरीत एकमताने दोन्ही विषयांचा प्रत्येकी एक निबंध निवडण्यात आला. परिक्षक म्हणून शिक्षण विकास मंचच्या जिल्हा समन्वयक शिक्षकांनी आपले शाळेतील काम सांभाळून चोखपणे परीक्षण केले.

राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२४ अंतिम निकाल

## स्पर्धेला उत्तम प्रतिसाद

अशैक्षणिक कामे नसतील तर शिक्षक म्हणून आत्तापेक्षा अधिक मी काय-काय करू शकेन?या विषयासाठी शशिकांत नारायण कुंभार (शाळा - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केसे जिल्हा - सातारा)

दिपाली प्रविण जाधव (शाळा- जिल्हा परिषद प्राथमिक गारवडी जिल्हा सातारा) स्वाती विठ्ठल जोशी (शाळा मराठी विद्या मंदिर, तांबूळवाडी.

जिल्हा कोल्हापूर) शुभांगी प्रकाश निंबाळकर(शाळा जि. प. शाळा नारळवाडी जिल्हा- सातारा )

शिक्षकांना कोणत्या गोष्टीचे स्वातंत्र्य हवे आणि का? या विषयासाठी सौ. नर्मदा नरेश कनकी(शाळा नू.म.वि मराठी शाळा, सोलापूर. जिल्हा - सोलापूर)

कृष्णा निवृत्ती साळी.(शाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंजूर जिल्हा ठाणे) नितिन बाजीराव समुद्रे शाळा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा शिलोंडा जिल्हा पालघर)सुरेखा तानाजी जगदाळे.(शाळा जि.प.प्राथ. शाळा मेघलदरेवाडी जिल्हा सातारा) इंग्रजी माध्यमाच्या विषयासाठी अशैक्षणिक कामे नसतील तर शिक्षक म्हणून आत्तापेक्षा अधिक मी काय-काय करू शकेन? हेमंत किसन गवळे

शाळा - बी. एन. एन. कॉलेज, भिवंडी

जिल्हा - ठाणे )शिक्षकांना कोणत्या गोष्टीचे स्वातंत्र्य हवे आणि का? तनुजा शंकरसिंग पेनवाल शाळा नवोदय इंग्लिश हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, किसननगर जिल्हा ठाणे

यांचे क्रमांक आले असल्याची माहिती डॉ माधव सूर्यवंशी,मुख्य समन्वयक, शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर आणि योगेश कुदळे शिक्षण विभाग प्रमुख,यशवंतराव चव्हाण सेंटर यांनी दिली.

# फर्टीलायझर कंपनीत चोरांना रंगेहाथ पकडले

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता पनवेल(प्रतिनिधी) :**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील दीपक फर्टीलायझर कंपनीमध्ये गुरुवारी मध्यरात्री तीन चोर दीपक फर्टीलायझर कंपनीत शिरुन चोरी करताना कंपनीच्या सुरक्षा यंत्रणेने त्रिकुटाला रंगेहाथ पकडले. यांच्याकडून सव्वा लाख रुपयांचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला.दीपक फर्टी लायझर कंपनीमध्ये शेतीच्या खतापासून ब्लास्टींग पावडर आणि पेट्रोकेमीकलची उत्पादने बनविली जातात. कंपनीलगतच्या वलम गावात राहणा-या तीन चोरटे गुरुवारी रात्री सव्वा एक वाजण्याच्या सूमारास १५ फूटी उंच कुंपनावरुन कंपनीत शिरले. कंपनीत शिरल्यावर चोरट्यांनी लोखंडी पाईप, लोखंडी अँगल, बॉक्स पाईप, लोखंडी जाळया आणि नॉयलनच्या दोरीसह दीपक कंपनीच्या सूरक्षा यंत्रणेने चोरट्यांना रंगेहाथ पकडले. १ लाख ३५ हजार रुपयांच्या मुद्देमालासह दीपक कंपनीच्या व्यवस्थापनाने चोरट्यांना तळोजा पोलीसांच्या स्वाधीन केले. पोलीसांनी या प्रकरणातील संशयीत रामब्रिज चौहान, विकास रामब्रिज चौहान, दीपक चौहान यांना शुक्रवारी न्यायालया समोर हजर करण्यात येणार आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J




8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी